**MHLA090029512022**

## निशाणी क्र.२६ खालील आदेश

१. वादी यांनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, वादी हे गट क्र.२०/३ मध्ये एकूण ३ हे ३३ आर जमिनीचे मालक व कब्जेदार आहेत. वादी यांनी २१ गुंठे जमीन सोडून पूर्व पश्चिम बाजुकडून जमीन प्रतिवादी क्र.१ ते ७ यांना विक्री केली आहे. ७/१२ उताऱ्या नुसार वादी हे सध्या १५ गुंठे जमिनीचे मालक आहेत. प्रतिवादी क्र.४ व ५ हे खरेदीखत क्र.३६/२०२१ नुसार ५८ गुंठे जमीन विक्री केली आहे. त्यातून पूर्व बाजूची जमिनीच्या पश्चिम बाजुकडून ६ गुंठे जमीन प्रतिवादी क्र.४ व ५ यांच्याकडून विक्रीच्या ठरावानुसार खरेदी केल्याने वादी एकूण २१ गुंठे जमिनीचा मालक आहे.

२. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादग्रस्त जमीन ही वादीची वडिलोपार्जीत जमीन असल्याने वादी हे त्या जमिनीचे मालक व कब्जेदार आहेत. प्रतिवादी क्र.१ ते ७ हे जमिनीचे व्यापारी असून जमीन खरेदी करून प्लॅाटींग करून विक्री करतात. प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी वादीच्या जमिनीत अतिक्रमण करून वादीच्या ताब्यात अडथळा करून वादग्रस्त जमीन बळकवण्याचा प्रयत्न करत आहे. म्हणून जमीन गट क्र.२०/३ क्षेत्र ३ हे. ३३ गुंठेची मोजणी तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, उदगीर यांच्यामार्फत माजणी होणे आवश्यक आहे. वादी यांनी खालील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे.

***Isaq Nawab Shaikh Vs. Maidabee W/o Turabsab Shaikh and Ors.* (*Second Appeal No.*607 *of* 2016)**

३. प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.४२ वर त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत व पुढे असे अभिकथन केले आहे की, वादी हे २१ आर जमिनीच्या कब्जेवहिवाटीस असल्याचे खोटे कथन केले आहे. वादी

यांनी गट क्र.२०/३ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ७ यांना खरेदीदस्ता आधारे जमीन विक्री केली आहे. वादी यांनी सदरचा अर्ज जाणूनबुजून दाखल करून न्यायालयाची दिशाभूल केली आहे. वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये प्रतिवादीने अतिक्रमण केल्याबाबतचा उल्लेख केला आहे. परंतु, प्रतिवादी यांनी कोणत्या बाजुस किती जमीन अतिक्रमण केली आहे त्याबाबतचा उल्लेख अर्जात केला नाही. वादी हे महसूल अभिलेखा नुसार केवळ १५ आर जमिनीच्या कब्जेवहिवाटीस आहेत. सदरची बाब वादी यांना माहीत असताना देखील वादी यांनी त्याबाबतची नोंद ७/१२ उताऱ्यावर महसूल कार्यालया मार्फत करून घेतली नाही. वादीचा अर्ज हा खोटा, चुकीचा व बेकायदेशीर आहे. वादी यांनी खरी परिस्थिती न्यायालयापासून लपवून पुरावा गोळा करण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दाखल केला आहे. म्हणून वादीचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. प्रतिवादी यांनी खालील न्यायनिर्णयावर भिस्त ठेवली आहे.

> ***Sayyad Hidayat Syyad Lal Vs. Dharmapal Shankarappa Cahwale and Others (Writ Petition No.**13867 **of** 2019)*

४. प्रतिवादी क्र.३ ते ५ सदर अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करून अर्जातील सर्व कथने स्पष्टपणे नाकारली आहेत.

५. युक्तीवाद ऐकला. अर्ज व म्हणणे वाचले. सदर दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी सदरचा दावा वाटणी होऊन स्वतंत्र ताबा मिळणेकरीता दाखल केला आहे. सर्वप्रथम येथे महत्वाची बाब अशी आहे की, वादी यांनी त्याच्या दाव्यामध्ये अतिक्रमणाबाबत कोणताही उल्लेख केला नाही. त्यांनी अतिक्रमण केल्याबाबतचा मजकूर पहिल्यांदा नि.क्र.२६ कडील अर्जामध्ये केला आहे. वादी यांनी त्यांच्या दाव्यामध्ये एका ठिकाणी प्रतिवादीने अडथळा केल्याचा मजकूर नमूद केला आहे तर नि.क्र.२६ अर्जामध्ये प्रतिवादीने अतिक्रमण केल्याबाबतचा उल्लेख केला आहे. वादी यांच्या दाव्याचे स्वरूप पाहाता प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये किती व कशाप्रकारे अतिक्रमण केले आहे त्याबाबचा कोणताही मजकूर नमूद केला नसल्याने वादी यांचा नि.क्र.२६ कडील अर्ज

नामंजूर करणे योग्य व उचीत होईल. वादी यांनी सदरचा अर्ज पुरावा एकत्र करण्याच्या उद्देशाने दाखल केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. सबब, पुढीलप्रमाणे आदेशः–

## आदेश

नि.क्र.२६ कडील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JYOTIMALA C GUPTA
Date: 2025.02.25 15:57:14 +0530

**(श्रीमती जे.सी गुप्ता)**

**दि.२५/०२/२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,उदगीर.**